# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१९

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

**मंगळवेढा (जि.सोलापूर) येथे महान तत्वज्ञ श्री.महात्मा बसवेश्वर यांचे स्मारक उभारणेबाबत**

**(१) १३७६५ (२८-०४-२०१५). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महान तत्वज्ञ श्री.महात्मा बसवेश्वर यांचे मंगळवेढ्यामध्ये १२ वर्षे वास्तव्य होते अशा थोर व्यक्तीचे स्मारक उभारणी प्रस्ताव शासन दरबार प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यावर काय कार्यवाही होणार आहे,

(३) असल्यास, उक्त स्मारकासाठी निधी उपलब्ध करण्यात आला आहे काय,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२४-०७-२०१९) :** (१) व (२) हे खरे आहे.

सदर स्मारक उभारण्याबाबत मा.पालकमंत्री, सोलापूर यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २०.३.२०१७ रोजी गठीत करण्यात आले आहे.

(३) सदर प्रकरणी, मा.मंत्री (वित्त, नियोजन व वने) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १.११.२०१८ रोजीच्या बैठकीत महात्मा बसवेश्वर यांचे स्मारक बांधकाम आराखडा रु.२५ कोटीच्या मर्यादेत जिल्हाधिकारी,सोलापूर यांना निर्देश देण्यात आले होते. तसेच,कृषि पर्यटन विकास आराखडा तयार करुन स्वतंत्रपणे प्रस्ताव कृषि आयुक्तालयामार्फत कृषि विभागाकडे सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले होते.

वरील निर्देशाप्रमाणे कृषि विभागाच्या अखत्यारीतील जागेवर महात्मा बसवेश्वर यांचे स्मारक बांधकाम आराखडा रु.२५ कोटींचा प्रस्ताव प्राप्त झाला असून पुढील यथोचित कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील मौजे जेऊर किंवा करमाळा येथे मुलींसाठी शासकीय वसतीगृह सुरु करण्याबाबत**

**(२) १०९०३५ (१७-०४-२०१८). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील मौजे जेऊर किंवा करमाळा येथे मुलींसाठी शासकीय वसतीगृह सुरु करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.सामाजिक न्याय मंत्री यांचेकडे दिनांक २६ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास पत्रान्वये केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने उक्त प्रस्ताव पत्र क्र.बीसीएच-२०१६/प्र.क्र.८४/शिक्षण-२, सामाजिक न्याय विभाग, मुंबई यांस दिनांक २७ जानेवारी, २०१७ रोजी प्राप्त झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (२६-०७-२०१९) :** (१) होय.
(२) व (३) ज्या तालुक्यामध्ये शासकीय वसतीगृह नाही त्या तालुक्यामध्ये मागासवर्गीय मुलां-मुलीसाठी वसतीगृह सुरू करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा विद्युत पुरवठ्यापासून वंचित असल्याबाबत**

**(३) १०९५८९ (०४-०४-२०१८). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सुमारे ७ हजार २८० शाळा विद्युत पुरवठ्यापासून वंचित असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व सदरहू शाळांना विद्युत पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-०८-२०१९) :** (१) हे खरे नाही. शाळांनी वीज जोडणी अर्ज सादर करुन निर्धारित शुल्क व अनामत रक्कमेचा भरणा केल्यास तातडीने वीज जोडणी देण्याची कार्यवाही करण्यात येते.
(२) व (३) यासंदर्भात महावितरणमार्फत चौकशी करण्यात आली आहे. वीज जोडणी शुल्काचा भरणा केलेल्या २८० स्थानिक संस्थांच्या शाळांना वीज पुरवठा देण्यात आला आहे. तसेच माहे

डिसेंबर, २०१७ अखेर वीज जोडणी शुल्काचा भरणा केलेल्या एकूण २४ शाळांना नवीन वीज जोडणी देण्याकरिता आवश्यक पायाभूत सुविधा उभारणीचे काम प्रगतीपथावर असून काम पूर्ण होताच त्यांना वीज पुरवठा करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सौंदळ (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील कार्यालयामध्ये घरगुती वीज मीटरसाठी पैसे भरुनही अदयाप वीज कनेक्शन देण्यात आलेले नसल्याबाबत**

**(४) १११३४८ (२४-०५-२०१८). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सौंदळ (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील कार्यालयामध्ये घरगुती वीज मीटरसाठी पाच वर्षांपूर्वी १ हजार २०० रुपये भरुनही अद्याप वीज जोडणी देण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राजापूर व रत्नागिरी येथील महावितरण कार्यालयात सतत पाच वर्षे पाठपुरावा करुनही कोणतीच कार्यवाही होत नसल्याने दिनांक २६ जानेवारी रोजी राजापूर महावितरण कार्यालयासमोर ताम्हाणे वरचीवाडी येथील ग्रामस्थ सुरेश चव्हाण यांनी आमरण उपोषण करण्याचा निर्णय घेतला, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले, तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-०८-२०१९) :** (१) हे खरे आहे. जिल्हा रत्नागिरी, राजापूर तालुक्यातील ताम्हाणे येथील नागरिकाने दिनांक २७.०६.२०१३ रोजी घरगुती वीज जोडणीसाठी रु.११००/- इतकी रक्कम भरली होती. सदरील वीज जोडणी दिनांक ०९.०२.२०१८ रोजी देण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही.
(३) श्री. सुरेश चव्हाण यांना वीज कनेक्शन देण्यास झालेल्या दिरंगाईबाबत एप्रिल, २०११ ते जानेवारी, २०१८ या कालावधीत कार्यरत असणाऱ्या एकूण ०७ उपविभागीय अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई सुरु करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात कर्करोगाच्या रुग्णांच्या वाढत्या प्रमाणाबाबत**

**(५) ११४२३७ (०१-०४-२०१८). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कर्करोगाच्या रुग्णांचे प्रमाण वाढत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा शेवटच्या आठवडयात शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रोगांवरील उपचार अत्यंत खर्चिक झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्य सरकारच्या विविध योजनातून अनेक मोठया आजारावर उपचार केले जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कर्करोगाच्या रुग्णांना देखील मुख्यमंत्री, आरोग्य कक्ष, महात्मा फुले जीवनदायी आरोग्य सेवेचा माध्यमातून सुविधा पुरविण्यात येतील असेही शासनाचा निर्णय झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-०८-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) हे खरे आहे.
(५) कर्करोगावर महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजने अंतर्गत मेडिकल ऑन्कॉलॉजी, रेडिएशन ऑन्कॉलॉजी, सर्जीकल ऑन्कॉलॉजी इ. विविध उपचार पध्दतीना मान्यता असून त्यानुसार मान्यताप्राप्त रुग्णालयांमध्ये शासनमान्य लाभार्थ्यांवर झालेल्या उपचाराच्या खर्चावर रु. १.५० लक्ष पर्यंत प्रतिपूर्ती करण्यात येते.

---

## स्व.इंदिरा गांधी उपजिल्हा रुग्णालयाच्या (ता.भिवंडी, जि.ठाणे) दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन देणेबाबत

**(६) १२९२६४ (१०-१२-२०१८). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) स्व.इंदिरा गांधी उपजिल्हा रुग्णालय (ता.भिवंडी, जि.ठाणे) दुरुस्तीसाठी निधी तातडीने उपलब्ध करुन देणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक १० डिसेंबर, २०१५, दिनांक ९ डिसेंबर, २०१६ व दिनांक ७ मार्च, २०१७ रोजी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांना लेखी निवेदन दिले परंतु यावर काहीच कार्यवाही झाली नसल्याने दिनांक २२ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.पालकमंत्री, जि.ठाणे यांनाही लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनानुसार स्व.इंदिरा गांधी उपजिल्हा रुग्णालयाच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-०८-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

मा. रुपेश म्हात्रे, विधानसभा सदस्य यांनी मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांना अग्रेषित केलेले दि. ७/१२/२०१५ च्या पत्राची प्रत प्राप्त झालेली आहे.

(२) स्व.इंदिरा गांधी उपजिल्हा रुग्णालय भिवंडी इमारतीचे विस्तारीकरण, बांधकाम व दुरुस्ती साठी जिल्हा नियोजन समिती, ठाणे यांचेकडून सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात रक्कम रु.२.०० कोटी निधीस प्रशासकीय मान्यता देण्यात येवून त्यापैकी रुक्कम रु.१.०० कोटी इतका निधी सार्वजनिक बांधकाम विभागकडे वर्ग करण्यात आलेला आहे. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्नच उद्भवत नाही.

---

**दौंड (जि.पुणे) विधानसभा मतदार संघातील आरोग्य विभागाच्या प्रलंबित प्रस्तावास मंजुरी मिळुन तातडीने निधीची तरतूद होणेबाबत**

**(७) १३२८११ (११-१२-२०१८). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दौड (जि.पुणे) तालूक्यातील पाटस येथे ट्रॉमाकेअर सेंटर व आरोग्य केंद्र सुरु करणे व वरवंड येथे उपजिल्हा रुग्णालय सुरु करणे या दोन प्रलंबित प्रस्तावास मंजुरी मिळुन तातडीने निधीची तरतूद करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक २५ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त दोन्ही प्रस्ताव क्र. संकीर्ण २०१८/प्र.क्र.३३१ /आ.३अ मा मुख्यमंत्री कार्यालय ०७/११/०९/२०१८ Com NO. ३८७७१२ या संदर्भीय क्रमांकाने दाखल झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रस्तावास मान्यता देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-०८-२०१९) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) सन २०११ च्या लोकसंख्येच्या आधारावर रुग्णालयाची स्थापना व श्रेणीवर्धन करण्याबाबतचा जोड बृहत आराखडा तयार करण्याचे काम सुरु असून पाटस व वरवंड येथे उपजिल्हा रुग्णालय सुरु करण्याची मागणी जोड बृहत आराखडया मध्ये समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरातील घोरपडे पेठ येथील इमारतीमधील उद्वाहनात अडकून मुलीचा झालेला मृत्यू**

**(८) १३३०८६ (१०-१२-२०१८). श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील घोरपडे पेठ येथील रहिवाशी इमारतीच्या उद्वाहनामध्ये अडकून ७ वर्षीय कुमारी नशरा रहेमान खान हीचा मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार शासनाने संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच रहिवाशी इमारती मधील उद्वाहनाच्या सुरक्षतेबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-०८-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) सदर अपघाताची चौकशी सहाय्यक विद्युत निरीक्षक (उद्वाहन), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, खडकी, पुणे या कार्यालयामार्फत दिनांक २२.१०.२०१८ रोजी करण्यात आलेली आहे. सदर ठिकाणचे उद्वाहन अनधिकृत असून विभागाची कोणतीही परवानगी/अनुज्ञाप्ती घेण्यात आलेली नव्हती. दिनांक २०.१०.२०१८ रोजी मे.जोरा कॉम्पलेक्स, घोरपडे पेठ, पुणे या इमारतीमध्ये अपघातग्रस्त मुलगी ही तिसऱ्या मजल्यावरुन उद्वाहनाच्या आतील दरवाजा उघडून आतमध्ये जात असताना बाहेरील दरवाजा डोअर क्लोजरमुळे आपोआप बंद झाला. परंतु सदर मुलगी ही पूर्णपणे उद्वाहन कारच्या आतमध्ये गेलेली नव्हती. त्याचवेळी सदर उद्वाहनाला वरील मजल्याचा कॉल आला. उद्वाहन वरच्या दिशेने गेले आणि सदर मुलगी कार प्लॅटफॉर्म व लँडींग डोअर टॉप सील यामध्ये अडकून प्राणांतिक अपघात झाला आहे.

यासंदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे :-

१) सदर उद्वाहन अनधिकृत व असुरक्षित असल्याने दि.२४.१०.२०१८ रोजी लेखी सूचना देऊन बंद ठेवण्यात आले आहे.

२) इमारतीचे विकासक श्री.रफीक अझीझ शेख (भागीदार) मे.जी नवाझ कंस्ट्रक्शन, गणेशपेठ, पुणे यांना दिनांक २४.१०.२०१८ रोजी कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली आहे.

३) अनधिकृतपणे देखभाल व दुरुस्ती करणारा श्री. मोहम्मद जहिर मौला शेख यांना दिनांक २४.१०.२०१८ रोजी कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जिल्हा वार्षिक योजनेमधून सन २०१२ मधे मंजूर असलेले विद्युत पोलचे काम अपूर्ण असल्याबाबत

**(९) १३४०७१ (०७-१२-२०१८). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यातील मरकळ ग्रामपंचायतीसाठी जिल्हा वार्षिक योजना सन २०११-१२ अंतर्गत सुमारे १९० विद्युत खांब नागरिकांच्या सोयीसाठी विशेष अनुदानांतर्गत दि.२९/०३/२०१२ ला मंजूर करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०११-१२ मधे मंजूर केलेल्या १९० खांबांसाठी ग्रामपंचायतीने स्वतःचा हिस्सा (२५%) म्हणून रु. २,८३,५०० दिनांक २१ मे, २०१२ रोजी महावितरणकडे भरुनही फक्त ६४ खांब उभारून काम अपूर्ण सोडल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१२ मध्ये मंजुर असलेले काम अपूर्ण ठेवण्यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासनाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-०८-२०१९) :** (१) हे खरे आहे. पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यातील मरकळ ग्रामपंचायतीसाठी जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत दिनांक १८.०३.२०११ रोजी १२८ पोल उभारुन त्यावर १९० एल.टी. ब्रॅकेट बसविण्याच्या कामास मंजूरी देण्यात आली होती.
(२) सदर कामासाठी मंजूर १९० स्ट्रीट लाईट ब्रॅकेट्स व त्यासाठी लागणाऱ्या १२८ खांबाचे काम उपलब्ध निधीतून टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्यात आलेले आहे.
(३) सन २०१२ मध्ये मंजूर असलेले काम अपूर्ण ठेवण्यास जबाबदार अधिकाऱ्यांची चौकशी करण्यात आली असून त्यांच्यावर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### ऐतिहासिक पन्हाळगड किल्ल्याची (जि.कोल्हापूर) झालेली दुरवस्था

**(१०) १३५०५५ (०९-०७-२०१९). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळगड अत्यंत प्रसिद्ध किल्ला असून यास ऐतिहासिक महत्व लाभलेले आहे, तसेच या ऐतिहासिक गडास दरवर्षी लाखो पर्यटक भेट देत असतात हे हि खरे आहे काय,
(२) असल्यास, अशा ऐतिहासिक किल्ल्यावरील डेरेमहाल, तीन दरवाजा, कलावंतीण महाल, दारुगोळा कोठार, तटबंदी या ऐतिहासिक वास्तूंची पडझड होवून दुरवस्था झाली आहे हे हि खरे आहे काय,
(३) असल्यास, पन्हाळगड या ऐतिहासिक किल्ल्याचे संवर्धन करण्याची मागणी सर्व स्तरातून होत आहे हे हि खरे आहे काय,
(४) असल्यास, पन्हाळगड किल्ल्याच्या संवर्धनाकरिता तातडीने निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०८-२०१९) :** (१) हे खरे आहे.
पन्हाळा किल्ला हा केंद्र शासनाच्या अखत्यारीतील राष्ट्रीय संरक्षित स्मारक आहे.
(२) हे खरे आहे. पन्हाळगड किल्ल्यावरील पुरावशेषांचे काळानुसार तसेच तेथील वातावरणानुसार पडझड झाली आहे.
(३) हे खरे आहे. या किल्ल्याच्या संवर्धनाकरिता जनतेकडून काही पत्रे प्राप्त झाली आहे.

(४) विभागीय निधीतून मागील काही वर्षात जतन व संवर्धनाचे काम भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, मुंबई यांच्याद्वारे केले गेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वनपरिक्षेत्रात मोहफुल वेचण्या-या व्यक्तींना जंगली श्वापदांपासून संरक्षण देण्यासाठी करावयाच्या उपाययोजना**

**(११) १३५२२० (१२-०७-२०१९). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुर्व विदर्भातील चंद्रपूर जिल्यातील परसोडी वनपरिक्षेत्र कक्ष क्र.५३० (ता.गोंडपीपरी) व नवेगाँव वनपरिक्षेत्र कक्ष क्र.१५७ (ता.ब्रम्हपुरी) या परिसरामध्ये मोहफुल वेचण्याकरीता गेलेल्या एक पुरुष व महिला यांचा वाघाच्या हल्यात मृत्यू झाल्याची घटना माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाघाच्या हल्यात मृत्यू झालेल्या व्यक्तीच्या नातेवाईकांना शासनाने आर्थिक मदत केली आहे काय,
(३) असल्यास, संबधित वनपरिक्षेत्रात मोहफूल वेचणा-या व्यक्तींची माहिती वन कर्मचा-यांना असते काय, तसेच शासनाने वनपरिक्षेत्रात मोहफुल वेचणा-या व्यक्तीना वाघापासुन व इतर जंगली जनावरापासून संरक्षण देण्यासाठी योजना आखल्या आहेत काय,
(४) असल्यास, वनपरिक्षेत्रात मोहफूल वेचणा-यांना शासनाने अधिकृत परवाने निर्गमित केले आहे काय,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३१-०८-२०१९) :** (१) व (२) चंद्रपूर वनवृत्तातील ब्रम्हपुरी व मध्य चांदा वन विभागात माहे एप्रिल, २०१९ मध्ये मोहफूल वेचण्याकरीता गेलेल्या ३ व्यक्तीचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाल्याची घटना निदर्शनास आढळून आली आहे.

वाघाच्या हल्ल्यात मृत्यू पावलेल्या ३ व्यक्तींच्या कायदेशीर वारसास प्रचलित शासन निर्णयान्वये प्रत्येकी रु. १५.००लक्ष अर्थसहाय्य अदा करण्यात आले आहे.
(३) वनपरिक्षेत्रात मोहफुले वेचणा-या प्रत्येक व्यक्तीची माहिती वनकर्मचा-यांना नसते. मानव व वन्यप्राणी यांच्यातील संघर्ष कमी करण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात:-

• मोहफुलाचे हंगामामध्ये वन विभागामार्फत विशेष गस्ती कार्यक्रम राबवून वाघ व इतर वन्यप्राण्यांचे अस्तित्वाबाबत गावक-यांना अवगत करण्यात येते.

• मानव व वन्यप्राणी यांचा संघर्षाची परिस्थतीत उद्भविल्यास घ्यावयाच्या खबरदारीबाबत वेळोवेळी जनजागृती करण्यात येते.

• वन्यप्राण्यांच्या सततच्या वावरामुळे मोहफुले वेचण्याकरीता जाऊ न शकलेल्या व त्यामुळे रोजगारापासून वंचित झालेल्या गावक-यांकरीता स्थळनिहाय कामाचे नियोजन करून त्यांना रोजगार मिळवून देण्याचे अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.

• वन्यप्राण्यांचे वावराचे दृष्टीने अतिसंवेदनशील असलेल्या गावांमध्ये मोहफुले हंगामामध्ये मनुष्यहानीच्या घटना टाळण्याच्या अनुषंगाने सदर गावांमध्ये मोहफुले हंगामाच्या २ ते ३ महिन्यांकरीता प्रत्येक गावातून ३ ते ४ व्यक्तींची निवड करून त्या व्यक्तींना वनविभागाचे कर्मचारी रेडिओ कॉलरिंग संकेताचे आधारे वाघाचे अस्तित्व असलेल्या क्षेत्राबाबत सकाळी ४.०० वा.व दुपारी ०३.०० वा. माहिती देतात व त्यानुसार निवड केलेले व्यक्ती वाघाचे अस्तित्व असलेल्या क्षेत्रापासून २ ते ३ कि.मी. अंतरापर्यंत कोणतेही गावकरी जाणार नाहीत याबाबत गावक-यांना अवगत करून देतात व त्यांना सदर क्षेत्रात जाण्यापासून परावृत्त करतात.

(४) वनपरिक्षेत्रात मोहफुले वेचणा-यांना वनविभागाकडून अधिकृत परवाने निर्गमित करण्यात आलेले नाहीत.

(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**कंधार (ता.जि.नांदेड) येथील भुईकोट किल्ला व परिसराची दूरवस्था झाल्याबाबत**

**(१२) १३५३९९ (११-०७-२०१९). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कंधार (जि.नांदेड) येथील १२०० वर्षाची वैभवशाली समृध्द वारसा असलेला भूईकोट किल्ला सध्या पर्यटनाचे एक प्रमुख केंद्र असून येथे सध्य:स्थितीत किल्ल्याभोवती झाडेझुडपे वाढल्याने या किल्ल्याचे सौंदर्य व वैभव लुप्त होऊन किल्ल्याची दूरवस्था झाल्याने पर्यटक नाराजी व्यक्त करीत असल्याचे दिनांक ११ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू किल्ल्याला दरवर्षी लाखो पर्यटक तसेच शालेय विद्यार्थी भेट देत असल्याने किल्ल्याची वास्तू जतन करणे, डागडुजी, सौंदर्यीकरण करणे, पर्यटकांना स्वच्छतागृह, पाणी इत्यादी सोयी-सुविधा उपलब्ध करुन देणे, झाडाझुडपांचे समूळ उच्चाटन करणे, लालमहाल पर्यटकांसाठी खुला करणे इत्यादी मागण्या पर्यटकांकडून होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काही दिवसांपूर्वीच पुरातत्व विभागाने सुमारे पाच कोटी रुपये किल्ल्याच्या जतन आणि संवर्धनाकरिता खर्च केले परंतु अदयाप किल्ल्यात पाणी तसेच इतर सुविधा उपलब्ध नसल्यामुळे पर्यटकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०८-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) हे खरे नाही.

प्राधान्य क्रमाने किल्ल्याच्या आवश्यक जतन दुरुस्तीचे व झाडे झुडपे काढण्याचे काम करण्यात आले आहे. तसेच पर्यटकांकरिता स्वच्छतागृह व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मोताळा (जि.बुलढाणा) तालुक्यातील उपकोषागार कार्यालयात पदे रिक्त असल्याबाबत**

**(१३) १३५६४३ (१०-०७-२०१९). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोताळा (जि.बुलढाणा) तालुक्यातील उपकोषागार कार्यालयातील रिक्त पदांमुळे जेष्ठ नागरिक,निवृत्ती धारक यांची गैरसोय होत असल्याचे दिनांक ०१ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, त्यानुसार उपकोषागार कार्यालयातील रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२९-०८-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) निवृत्ती वेतन धारकाचे मागण्याचे प्रदान जिल्हा कोषागार कार्यालय, बुलढाणा येथुन केले जाते. मोताळा तालुक्यातील कोणत्याही निवृत्तीवेतनधारक / जेष्ठ नागरीक यांची प्रलंबित मागणीबाबत तक्रार प्राप्त न झाल्याने चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) (३) व (४) उपकोषागार कार्यालय, मोताळा येथे गट-क संवर्गातील सर्व पदे भरण्यात आलेली आहेत. वर्ग-ड चे फक्त १ पद रिक्त आहे.

---

**राज्यातील साखर कारखान्यांनी कमी दराने साखर विक्री केल्याबाबत**

**(१४) १३५७१० (१५-०७-२०१९). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील २२ साखर कारखान्यांनी केंद्र व राज्य शासनाचे आदेश डावलुन कमी दरात केलेली साखर विक्री व उत्तर प्रदेशातील साखर कारखान्यांनी दर कमी करुन साखर विक्री करण्याचा लावलेला सपाटा यामुळे राज्यातील साखर कारखान्यांकडे २८ हजार कोटींची साखर पडून असल्याचे दिनांक ७ एप्रिल, २०१९ रोजी त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामध्ये कोल्हापूर विभागातील साखर कारखान्यांकडे पावणेआठ हजार कोटींची २५ लाख टन साखर पडून आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे पोत्याला १ रुपयांमध्ये कारखान्यांना दिवसाला २५ लाखाचा आर्थिक फटका बसत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन कमी दराने साखरविक्री करणाऱ्या साखर कारखान्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०३-०९-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

केंद्र शासनाने दि.१४ फेब्रुवारी २०१९ रोजी साखरेची देशांतर्गत बाजारपेठेमध्ये विक्री किंमत रु.३१००/- प्रति क्विंटल निश्चित केलेली असून राज्यातील सर्व साखर कारखान्यांचा मार्च २०१९ या महिन्यातील साखर विक्रीचा आढावा घेतला असता, कोणत्याही कारखान्याने रु. ३१००/- प्रती क्विंटल +GST (५%) पेक्षा कमी किंमतीने साखर विकलेली नसल्याचे दिसून आले आहे. राज्यामध्ये दि.३०/६/२०१९ अखेर ८१.६० लाख मे.टन साखर शिल्लक आहे असून रु.३१००/- आधारभूत किंमतीचा विचार करता त्याची किंमत रु.२५२९६ कोटी आहे.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

दि.३० जून, २०१९ रोजी कोल्हापूर विभागामध्ये एकूण ४१ साखर कारखान्यांकडे रु.६३६७.४० कोटी इतक्या रकमेची २०.५४ लाख मे.टन साखर शिल्लक आहे.

सदर शिल्लक साखरेवर साखर कारखान्यांना बँकेला व्याज द्यावे लागते हे खरे आहे. परंतू, केंद्र शासनाने साखर कारखान्यांना दि.१ जुलै, २०१८ ते दि.३० जून, २०१९ पर्यंतच्या साखर साठ्यासाठी व्याज दिलेले असल्यामुळे शिल्लक साखरेवरील व्याजामध्ये काही प्रमाणात अनुदान रुपाने मदत झालेली आहे.

भारतामधील साखर कारखान्यांकडे बाजारातील खपापेक्षा जास्त साखर शिल्लक आहे. त्यानुषंगाने केंद्र शासनाने रु.३१००/- प्रति क्विंटल देशांतर्गत विक्री दर ठरवून रिलीज मॅकेनिझम आणून साखर कारखान्यांचे नुकसान होणार नाही याची दक्षता घेतलेली आहे.

(४) राज्यातील सर्व साखर कारखान्यांचा मार्च २०१९ मध्ये आढावा घेतला असता कोणत्याही साखर कारखान्याने रु.३१००/- प्रति क्विंटलपेक्षा कमी दराने साखर विक्री केल्याचे दिसून आले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील राज्य परिवहन महामंडळाच्या शिवशाही शयनयानी बसचे काही मार्ग बंद केल्याबाबत

**(१५) १३५८३९ (०८-०७-२०१९). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन महामंडळाच्या शिवशाही स्लीपर बस चे राज्यातील ४२ मार्गांपैकी १० मार्ग बंद केले असल्याची बाब माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ब-याचवेळा बसमागे केवळ पाच ते सहाच प्रवासी प्रवास करत असल्याने महामंडळाला तोटा होत असल्याने शिवशाही बसच्या दरात कपात केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात शिवशाही स्लीपर बसला प्रवाशांचा प्रतिसाद मिळण्याकरिता शासन काही नवीन धोरण राबविणार आहे काय,
(४) असल्यास, नवीन धोरणामध्ये प्रवाशांना कोणत्या सुखसोयी देण्यात येणार आहेत,
(५) नसल्यास, विलंबाचरी कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (३०-०८-२०१९) :** (१) होय.

राज्य परिवहन महामंडळाच्या वाहन ताफ्यातून संबंधित पुरवठादाराने त्यांच्या शिवशाही शयनयानी (स्लीपर) बसेस काढून घेतल्यामुळे सदर मार्ग बंद करण्यात आलेले आहेत. तथापि, प्रवाशांच्या सोयीसाठी सदर मार्गावर महामंडळाच्या इतर बसेसद्वारे वाहतूक सुरु ठेवण्यात आलेली आहे.
(२) होय.
(३) व (४) राज्यात शिवशाही शयनयानी (स्लीपर) बसला प्रवाशांचा प्रतिसाद मिळण्याकरिता सदर बसच्या भाडेदरात कपात करण्यात आलेली आहे. तसेच, प्रवाशांना अधिक सुविधा पुरविण्याच्या दृष्टीकोनातून शिवशाही शयनयानी (स्लीपर) बसेसमध्ये सीसीटीव्ही कॅमेरा, मोबईल चार्जिंग पॉईंट, मनोरंजनासाठी वायफाय सुविधा व व्हेईकल ट्रॅकींग सिस्टम (वाहन मागोवा प्रणाली) इ. सुविधा देण्यात आलेल्या असून, सद्यस्थितीत प्रवासी संख्येत वाढ झाल्याचे दिसत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राजापूर (जि.रत्नागिरी) शहराला ऐतिहासिक वारसा मिळवून देणा-या ब्रिटिशकालिन वखारीची पुनर्बांधणी करण्याबाबत

**(१६) १३६०४३ (११-०७-२०१९). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजापूर (जि.रत्नागिरी) शहराला ऐतिहासिक वारसा मिळवून देणा-या ब्रिटीशकालिन वखारीची पुनर्बांधणी करुन तिचे पुरातन वास्तुसंग्रहालय व आर्ट गॅलरीमध्ये रुपांतर करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीसंदर्भात पालकमंत्री, रत्नागिरी यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०८-२०१९) :** (१) हे अंशतः खरे आहे.

श्री.जगदीश ब. पवार, माय राजापूर संस्था, राजापूर यांनी राजापूर शहरातील ऐतिहासिक वखारीच्या पुनर्बांधणी बाबत मा. आमदार श्री. प्रसाद लाड यांच्याकडे विनंती केली आहे.

श्री. जगदीश ब. पवार यांच्या विनंतीस अनुलक्षून मा. आमदार श्री. प्रसाद लाड यांनी वखारीच्या पुर्नबांधणी बाबत आपल्या स्तरावर प्रयत्न करावा अशी विनंती दि.२३.०१.२०१९ च्या पत्रान्वये मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे केली आहे.

(२) असे निदर्शनास आले नाही.

(३) राजापूर येथील इंग्रज वखारीची इमारत धोकादायक झाल्याने २००५ साली जमिनदोस्त करण्यात आली आहे. सद्यस्थितीत वखारीचे फक्त जोत्यापर्यंतचे अवशेष शिल्लक आहेत. सदर ठिकाणी वखार ही वास्तुच अस्तित्वात नसल्याने इंग्रज वखार अशी संबोधली जाणारी वास्तु राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करणे उचित ठरणार नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### येवला (जि.नाशिक) येथे अल्पसंख्यांक समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता स्वतंत्र वसतीगृहे बांधण्याबाबत

**(१७) १३६६५० (०६-०७-२०१९). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) येथे अल्पसंख्यांक समाजातील उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी व विद्यार्थीनींकरिता स्वतंत्र वसतीगृहे बांधण्याकरिता शासनाकडे प्रस्ताव पाठविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २४ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसतीगृहे बांधण्याकरिता जागेचा शोध घेवून शासनाला प्रस्ताव पाठवावा असे जिल्हाधिकारी नाशिक यांना दिनांक २० नोव्हेंबर, २०१७ च्या पत्रान्वये निर्देश दिलेले आहेत, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार येवला येथे अल्पसंख्यांक समाजातील उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी व विद्यार्थीनींकरिता स्वतंत्र वसतीगृहे बांधण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२८-०८-२०१९) :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) ज्या ठिकाणी वसतिगृह बांधावयाचे आहे त्याठिकाणी उपलब्ध असलेल्या उच्च शिक्षणाच्या सुविधा, जवळपासच्या शैक्षणिक संस्था, मागणी व त्या परिसरातील अल्पसंख्याकांची लोकसंख्या इत्यादी बाबी विचारात घेऊन नाशिक जिल्यात जागेचा शोध घेण्यात येत आहे.

---

**राज्यातील दुष्काळ निवारणाकरिता उपाययोजना करण्याबाबत**

**(१८) १३६९९० (१०-०७-२०१९). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दुष्काळाची तीव्रता लक्षात घेऊन शासनाने तातडीने उपाययोजना करण्यासाठी आचारसंहिता शिथील करण्यात यावी अशी मागणी राज्याचे मुख्यमंत्री यांनी मुख्य निवडणूक आयुक्तांकडे दिनांक २४ एप्रिल, २०१९ रोजी आयोगास प्रस्ताव पाठवून केली आहे, हे खरे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने मुख्य निवडणूक आयुक्तांने दुष्काळाची व पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेवून त्या भागात पाणी पुरवठा योजनांना मंजूरी किंवा दुरुस्ती वा अन्य कामे करण्यास परवानगी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने कोणत्या पाणी पुरवठा योजनांना मंजूरी किंवा त्यांची दुरुस्ती वा अन्य कामे करण्यास संबंधित विभागांना परवानगी दिली आहे काय,

(४) असल्यास, सद्यःस्थितीत दुष्काळ निवारण व पाणी टंचाई याबाबत काय परिस्थिती आहे ?

**श्री. बबनराव लोणीकर (३१-०८-२०१९) :** (१) मा.मुख्य सचिव यांचे स्तरावरुन दिनांक २४ एप्रिल, २०१९ रोजी पिण्याच्या पाण्याच्या उपाययोजना घेण्याकरिता निवडणूक आयोगाची परवानगी संदर्भात प्रस्ताव सादर केला होता. तसेच मा. मुख्यमंत्री महोदयांच्या स्तरावरुन दिनांक ३० एप्रिल, २०१९ अन्वये दुष्काळ निवारणाच्या उपाययोजना घेण्याकरिता आदर्श आचारसंहिता शिथिल करण्याचा प्रस्ताव सादर केला होता.

(२) हे खरे आहे.

(३) शासनपत्र दिनांक ०४ मे, २०१९ अन्वये राज्यातील निवडणूक झालेल्या सर्व मतदारसंघात नियमित पिण्याच्या पाण्याच्या नळ पाणी पुरवठा योजनांना मंजुरी देणे अथवा त्यांची अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(४) पिण्याच्या पाण्याच्या टंचाईच्या अनुषंगाने संपूर्ण महाराष्ट्र राज्याचा माहे ऑक्टोबर, २०१८ ते जून, २०१९ या कालावधीकरिता संभाव्य पाणी टंचाई कृती आराखडा तयार करण्यात आला असून एकूण ४३९८२ गावे व २९२६३ वाडया यामध्ये एकूण ८०४८१ इतक्या उपाययोजना प्रस्तावित करण्यात आल्या होत्या.

तसेच दिनांक २९.०७.२०१९ च्या टँकर अहवालानुसार संपूर्ण महाराष्ट्रातील ३३५३ गावे व ८५८१ वाडया यामध्ये एकूण ४२९३ टँकर्सव्दारे व पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात येत आहे.

---

**कोवाड (ता.चंदगड, जि.कोल्हापूर या गावातील बससेवा नियमित करण्याबाबत.**

**(१९) १३७०७१ (०८-०७-२०१९). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोवाड (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) या गावातील बाजारपेठ मोठी असून तेथे शैक्षणिक संस्था मोठया प्रमाणात असल्याने सर्व गावातून विद्यार्थी तेथे येत असतात परंतु त्याठिकाणी बससेवा नियमित नसल्याने तेथे येणाऱ्या लोकांची व विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, बस फेऱ्यांच्या नियंत्रणासाठी कंट्रोल पॉईंट व बसस्थानकही अतिशय लहान व अरुंद आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रवाशांची व विद्यार्थ्यांची गैरसोय दूर करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.परिवहन मंत्री यांचेकडे दिनांक ३० नोव्हेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणी संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (३०-०८-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) कोवाड गावाचा विस्तार, लोकसंख्या, चालनात असणाऱ्या राज्य परिवहन फेऱ्यांची संख्या व त्यांची वारंवारता या सर्व बाबींचा विचार करता, कोवाड या ठिकाणी वाहतूक नियंत्रक कक्ष सुरु करणे संयुक्तिक वाटत नाही. सदर ठिकाणी ४०X१० आकाराचा मार्ग निवारा असून, त्याचा वापर प्रवासी करत आहेत. तसेच, महामंडळाद्वारे कोवाड गावाकरिता नियमित ७९ बस फेऱ्या चालनात आहेत.

सदरबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांना राज्य परिवहन महामंडळाच्या दि.३०.०५.२०१९ च्या पत्रान्वये कळविण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे खोपी (ता.भोर, जि.पुणे) या गावात गायरान जमीनच नसल्याबाबत**

**(२०) १३७२५५ (१२-०७-२०१९). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे खोपी (ता.भोर, जि.पुणे) येथील वनविभागाच्या मालकीची जमीन गट क्र. ३९१ मध्ये कातकरी समाजाची सुमारे २५ कुटूंबे मागील अनेक वर्षापासून कच्च्या घरामध्ये वास्तव्यास आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची जागा यापूर्वी गायरान होती परंतु कालातंराने ती वनविभागाकडे हस्तांतरीत झाल्याने या गावाला गायरान जमीनच नसल्याचे माहे जानेवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, वन हक्क कायदा २००५ अन्वये अशा कुटूंबियांना घरांसाठी जागा उपलब्ध करुन देणे आवश्यक असतानाही शासन या प्रकरणी दुर्लक्ष करीत असल्याने सदरहू कातकरी, आदिवासी कुटूंबाची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३१-०८-२०१९) :** (१) मौजे खोपी (ता.भोर. जि.पुणे) येथील वन विभागाच्या मालकीची जमीन गट क्र. ३९१ मध्ये कातकरी समाजाची सुमारे २५ कुटूंबे मागील अनेक वर्षापासून कच्च्या घरामध्ये वास्तव्यास आहेत, हे खरे नाही.

तथापि, सदर वनक्षेत्रामध्ये मागील ८ ते ९ महिन्यांपासून कातकरी समाजाची ६ कुटुंबे वनक्षेत्रावर अतिक्रमण करुन कच्च्या घरात राहत आहेत.

(२) मौजे खोपी (ता.भोर, जि.पुणे) येथील जमीन गट क्र. ३९१ मधील क्षेत्र दिनांक ५.४.२००७ अन्वये भारतीय वन अधिनियम, १९२७ चे कलम २० अंतर्गत राखीव वन म्हणून अंतिमत: अधिसूचित करण्यात आले आहे.

(३) व (४) अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी वन हक्कांची मान्यता अधिनियम, २००६ व नियम, २००८ (सुधारित २०१२) मधील तरतूदींच्या अधीन राहून वन हक्कांची पडताळणी करुन पात्र दाव्यांना मान्यता दिली जाते.

सदर अधिनियमांतर्गत वनजमिनीवर असलेले अतिक्रमण नियमित करण्याची/ अतिक्रमणास मान्यता देण्याची तरतूद नाही

प्रश्नांकित क्षेत्रावरील अतिक्रमणे वन हक्क अधिनियमांतर्गत नियमित करता येऊ शकत नाहीत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मालेगाव (जि.नाशिक) शहरातील उर्दु शाळा क्र.६४ जवळील भूखंडावरील उर्दू घराच्या परिसरातील अतिक्रमणे हटविण्याबाबत.

**(२१) १३७४१२ (०६-०७-२०१९). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली)** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव (जि.नाशिक) शहरात सर्व्हे नं.१६९ मधील उर्दु शाळा क्र.६४ जवळील भूखंडावर अल्पसंख्याक विकास विभागामार्फत मंजूर उर्दुघराचे आजूबाजूला असलेल्या खाजगी अतिक्रमणे व खासगी शाळा असल्यामुळे या घराचे काम प्रलंबित आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील अतिक्रमणामुळे शासनाकडून प्राप्त निधीचा उपयोग थांबला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्याने, शासनाने या ठिकाणी असलेली अतिक्रमणे हटवून तसेच येथील शाळेला पर्यायी जागा देऊन या उर्दुघराचे काम लवकरात लवकर पुर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०३-०९-२०१९) :** (१) व (२) अंशत: खरे आहे. मालेगाव (जि.नाशिक), शहरात सर्व्हे नं.१६९ मधील उर्दू शाळा क्र.६४ जवळील भूखंडावर उभारण्यात आलेल्या उर्दू घराच्या इमारतीचे काम अंतीम टप्प्यात असून केवळ सरंक्षण भिंत आणि बाहय कामे प्रलंबित आहेत.
(३) व (४) उर्दू घराच्या परिसरातील अतिक्रमणे हटविण्याबाबत आयुक्त, मालेगाव महापालिका, मालेगाव यांना शासन स्तरावरुन सूचना देण्यात आल्या होत्या. त्यास अनुसरुन महापालिकेने उर्दू शाळेला दुसरीकडे स्थलांतरीत केले आहे. तसेच सदर परिसरातील खाजगी अतिक्रमणे हटविण्याबाबत महापालिकेने कार्यवाही सुरु केली असता त्यास स्थानिकांनी विरोध दर्शवून सदर कार्यवाही विरोधात मा.दिवाणी न्यायालय, वरिष्ठस्तर, मालेगाव येथे दावा क्र.७५/२०१९ आणि ८१/२०१९ दाखल केला आहे. दावा क्र.७५/२०१९ प्रकरणी मा.न्यायालयाने “जैसे थे परिस्थती” ठेवणेबाबत अंतरिम आदेश दिले असून सद्य:स्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

---

**पुसद (जि.यवतमाळ) येथील अन्न पुरवठा कार्यालयात दलालांकडून नागरिकांची होत असलेली फसवणूक**

**(२२) १३७४६७ (१०-०७-२०१९). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्ह्यातील पुसद येथील महसूल विभागातील अन्न पुरवठा कार्यालयात नवीन शिधापत्रिका वितरण व रद्द झालेल्या शिधापत्रिका ऑनलाईन करण्याच्या नावाखाली ठरावीक स्वस्तधान्य परवानाधारक व दलालांमार्फत नागरिकांची फसवणूक करीत असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कामाकरीता नागरिकांकडून दोन ते तीन हजार रुपये घेतले जात असून याबाबत उपविभागीय अधिकारी व तहसिलदार यांच्याकडे तक्रार करून कारवाई करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषी अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२३-०८-२०१९) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे. माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये तहसिल कार्यालय पुसद मध्ये या प्रकारची तक्रार प्राप्त झाली होती. तथापि तहसिलदार पुसद यांनी सदर तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या चौकशी मध्ये शिधापत्रिका ऑनलाईन करण्याच्या नावाखाली फसवणुक होत असल्याचे निदर्शनास आले नाही.

(३) तहसिलदार पुसद यांच्या अहवालानुसार सदर तक्रारीच्या अनुषंगाने मौजा पार्डी येथील रास्तभाव धान्य दुकानाची चौकशी केली असता चौकशीमध्ये शिधापत्रिका ऑनलाईन करण्याच्या नावाखाली फसवणुक करीत असल्याबाबत निदर्शनास आले नाही. परंतु मौजा पार्डी येथील रास्तभाव धान्य दुकानदाराविरुध्द शिधापत्रिका धारकांना पावती न देणे, धान्य कमी देणे व इतर दोष असल्यामुळे तहसिलदार यांच्या अहवालावरुन दिनांक १५.०४.२०१९ रोजी सदर दुकान निलंबित करण्यात आले आहे.

(४) कोणताही विलंब झालेला नाही.

---

**महाड (जि.रायगड) एमआयडीसीतील रासायनिक पाणी सावित्री नदीत सोडणाऱ्या कारखान्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(२३) १३७९७७ (१६-०७-२०१९). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि.रायगड) एमआयडीसीतील कारखान्यातून सोडण्यात येणाऱ्या प्रदूषित रासायनिक पाण्यामुळे बिरवाडी येथील सावित्री नदीपात्रातील अनेक मगरींना अंधत्व आल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील मगरीना सुरक्षित स्थळी हलविण्याबाबत तसेच प्रदुषण करणाऱ्या संबंधित कारखान्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३१-०८-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई शहरातील वरळी येथील शासकीय परिवहन सेवा कर्मचारी सहकारी पतसंस्थेत झालेला गैरव्यवहार**

**(२४) १३७९७९ (१३-०७-२०१९). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील वरळी येथील शासकीय परिवहन सेवा कर्मचारी सहकारी पतसंस्थेत गत सहा वर्षापासून गैरव्यवहार होत असल्याची बाब माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२५-०७-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.
पतसंस्थेमधील गैरव्यवहार सन २०१४ मधील फेरलेखापरिक्षणात निदर्शनास आला आहे.
(२) व (३) पतसंस्थेचे सन २००७-०८ ते सन २०११-१२ या कालावधीतील फेरलेखापरिक्षण अहवालानुसार पतसंस्थेमध्ये अपहार झाल्याचे निदर्शनास आल्याने पतसंस्थेच्या १८ संचालकांवर दिनांक १९.०३.२०१९ रोजी वरळी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

फेरलेखापरिक्षण अहवालाच्या अनुषंगाने संस्थेचे संचालक, अधिकारी व कर्मचारी अशा एकूण १७ अपचाऱ्यांवर रु.७९.४८ लाख इतक्या रक्कमेच्या नुकसानीची जबाबदारी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमाच्या कलम ८८ अन्वये निश्चित करण्यात आलेली आहे. या पतसंस्थेचे संचालक हे शासकीय परिवहन सेवेत कार्यरत आहेत. अशा कार्यरत असलेल्या ४ संचालकांच्या पगारातून दरमहा रु.५०००/- व १ संचालकाच्या पगारातून दरमहा रु.३०००/- इतकी रक्कम वसूल करण्यात येत आहे. तसेच उर्वरित रक्कमेच्या वसूलीची कार्यवाही सुरु आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७८ (अ) नुसार पतसंस्थेची कार्यकारीणी दि. २०.०५.२०१४ रोजीच्या आदेशान्वये बरखास्त करण्यात आलेली असून सद्य:स्थितीत पतसंस्थेवर प्राधिकृत अधिकारी कार्यरत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### ठाणे जिल्हयातील वसतिगृहात प्रवेश प्रक्रियेतील विलंबाबत

**(२५) १३८०६१ (१३-०७-२०१९). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी, कल्याण, शहापूर, उल्हासनगर व ठाणे या ठिकाणी असलेल्या मुलांमुलींच्या वसतिगृह प्रवेशाबाबत अंतिम यादी जाहीर होण्यासाठी होणारा विलंब व संपलेले शैक्षणिक वर्षातील सहा महिने विचारात घेता गोंधळलेले विद्यार्थी प्रवेशापासून वंचित रहात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रवेशाकरीता विलंब ठरणाऱ्या प्रवेश प्रक्रियेच्या अपयशाचे कारण न देता काही वसतिगृहे लांब असल्याने विद्यार्थी प्रवेश नाकारत असल्याची कारणे देत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने जास्तीत जास्त मागासवर्गीय मुलांची गैरसोय दुर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (२०-०८-२०१९) :** (१) नाही.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील बेसिक बी.एस.सी. नर्सीग हा अभ्यासक्रमासाठी सुरु करण्यात आलेल्या परिचर्या महाविद्यालयातील रिक्त पदाबाबत**

**(२६) १३८२२३ (०९-०७-२०१९). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सन २००६ पासून बेसिक बी.एस.सी. नर्सीग या अभ्यासक्रमासाठी चार परिचर्या महाविद्यालयात सुरु करण्यात आलेआहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या महाविद्यालयातून अभ्यासक्रम शिकविण्यासाठी आवश्यक असलेली अद्यापकांची पदे म्हणजेच प्राचार्या, उपप्राचार्या, प्राध्यापक व अधिव्याख्याता यांच्या किती नियुक्त्या करण्यात आल्या आहेत व उक्त पदे सेवा प्रवेश नियमानुसार भरण्यात आली आहेत काय,
(३) असल्यास, महाविद्यालयातील सदर पदे रिक्त असतील तर सदर पदे विनाविलंब भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२६-०८-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) नव्याने सुरु करण्यात आलेल्या महाविद्यालयांमध्ये पदे भरण्यासाठी सदर अध्यापकीय संवर्गातील एकूण ३८ पदांच्या भरतीची जाहिरात दिनांक ८.३.२०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. तथापि, श्रीमती संगीता भुजबळ यांनी या विरुध्द मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाकडे मूळ अर्ज क्र.२६४/२०१९ दाखल केला. यावर मा.न्यायाधिकरणाने दिनांक ५.४.२०१९ रोजी निर्णय दिला असून त्यामध्ये पदोन्नतीची पदे प्रथम भरण्यात येऊन ५० टक्के प्रमाणे सरळसेवेची पदे भरण्याची कार्यवाही करण्याबाबतचे आदेश दिले आहेत. त्यास अनुसरुन पदोन्नतीने व सरळसेवेने पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य शैक्षणिक तंत्रज्ञान संस्था बंद करण्याच्या घेण्यात आलेल्या निर्णयाबाबत**

**(२७) १३८३८५ (१०-०७-२०१९). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शैक्षणिक तंत्रज्ञान संस्था बालचित्रवाणी बंद करण्यासाठी झालेल्या नियामक मंडळाच्या बैठकीत ३४ सदस्यापैकी केवळ चार सदस्यांच्या उपस्थितीत बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे दिनांक ११ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्यानुसार निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास राज्य शैक्षणिक तंत्रज्ञान संस्था अर्थात बालचित्रवाणी बंद करण्याच्या निर्णयास स्थगिती देवून उक्त बेकायदा निर्णय घेण्याच्या प्रकरणाची चौकशीकरण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येणार आहे का

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार (०८-०८-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जत (जि.सांगली) तालुक्यातील पाणी टंचाई दूर करण्याबाबत**

**(२८) १३८९१७ (१०-०७-२०१९). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जत (जि.सांगली) तालुक्यातील ८६ गांवे आणि वाडया-वस्त्यांमध्ये पाणीटंचाई निर्माण झाल्याने येथील ग्रामस्थांना विशेषत: लहान मुले महिला यांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत असल्याचे दिनांक १७ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदर गावांना १०३ टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत असून टँकरमध्ये निर्जंतुकीकरण करण्याकरिता प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे टीसीएलचा वापर केला जात नसल्याचे तसेच टँकरच्या खेपांमध्ये अनियमितता झाल्याच्या तक्रारी दिनांक ३० एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास ग्रामस्थांनी केल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी करुन येथील दुष्काळग्रस्त जनतेला स्वच्छ व पुरेसे पाणी पुरवठा करणे तसेच टँकरच्या खेपांमध्ये अनियमितता करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (३१-०८-२०१९) :** (१) दिनांक १७ मार्च, २०१९ रोजी पर्यंत जत तालुक्यातील ६३ गावे व ४९६ वाडया वस्त्यांमध्ये ६८ टँकरव्दारे पाणी पुरवठा करण्यात आला आहे.

तसेच जत तालुक्यामध्ये १२३ गावांमध्ये टंचाई घोषित करण्यात आली असून आवश्यकतेनुसार टँकर सुरु करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. त्यामुळे लहान मुले/महिला यांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे, हे खरे नाही.

(२) दिनांक ३० एप्रिल, २०१९ रोजी पर्यंत जत तालुक्यातील ८७ गावे व ६५२ वाडया वस्त्यांसाठी पाणी पुरवठा करण्यात येत असलेल्या १०३ टँकर्सवर जीपीएस प्रणालीव्दारे नियंत्रण ठेवण्यात आले असून टँकरसोबत ठेवण्यात आलेल्या लॉगबुकवर ग्रामस्थ, सरपंच व ग्रामसेवक यांची स्वाक्षरी प्रतिदिन घेण्यात आली आहे.

तसेच, दिनांक १४ फेब्रुवारी, २०१९ रोजीच्या शासन परिपत्रकात देण्यात आलेल्या सूचनांनुसार टँकर भरण्याच्या ठिकाणी जलसुरक्षक यांची नेमणूक करण्यात आली असून आवश्यक टीसीएलची मात्रा टँकर भरताना देण्यात येत आहे. त्यामुळे टँकर खेपांमध्ये अनियमितता किंवा टीसीएलचा वापर केला जात नाही, हे म्हणणे खरे नाही.

(३) जत तालुक्यातील दुष्काळग्रस्त जनतेला स्वच्छ व निर्जंतुक पाणी पुरवठा करण्यात येत आहे. तथापि काही अपरिहार्य कारणामुळे (टँकरचे टायर खराब होणे, खंडीत वीज पुरवठा व टँकर नादुरुस्त होणे) इत्यादी मुळे टँकरच्या खेपा कमी पडत असल्याने व काही ठिकाणी टँकर बदलण्याबाबत ठेकेदारांना सूचना देऊनही विहीत वेळेत कार्यवाही करण्यास विलंब केल्याने ठेकेदारांना जिल्हाधिकारी सांगली यांचे कार्यालयीन आदेश दिनांक ०२.०७.२०१९ अन्वये ज्या टँकरच्या खेपा वारंवार कमी पडत असतील त्या टँकरना प्रतिदिनी रु. १०,०००/- प्रमाणे एकूण रु. १,८०,०००/- इतकी दंडात्मक कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पिपर्डा येथील (जि.चंद्रपूर) स्वस्थ धान्य दुकानासंदर्भात नियमबहाय्यरित्या दिलेल्या आदेशाबाबत

**(२९) १३९०६३ (१०-०७-२०१९). ॲड.संजय धोटे (राजूरा), डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हातील, कोरपना तालुक्यातील, पिपर्डा येथिल स्वस्थ धान्य दुकानाचे नियमानुसार आदर्श महिला परिवार बचत गट यांना प्राधिकार पत्र दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुर्व सुचना व प्राधिकार पत्र रद्द न करता पुनर्विलोकन आदेश ३ वर्षा पूर्वीचे असतांना ठरावीक मुद्दतीत अमलबजावणी न करता जिल्हा पूरवठा अधिकारी यांनी दिलेले आदेश नियमबहाय्यपणे रद्द करुन श्री.डिजी. ढगे दुकानदार पिपर्डा यांचे रास्तभाव दुकान पूर्ववत सुरु करण्याचे आदेशीत केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्राधिकार पत्र रद्द करुन महिला बचत गटाला देण्याची मागणी महिला बचत गटाने केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय असल्यास त्यात काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२८-०८-२०१९) :** (१), (२), (३) व (४) श्री. डि जी. ढगे दुकानदार पिपर्डा यांचे रास्तभाव दुकानातील गैरव्यवहारामुळे जिल्हा पुरवठा अधिकारी, चंद्रपूर यांनी त्यांचे प्राधिकार पत्र दि.१२.९.२००८ च्या आदेशान्वये रद्द केले होते. दरम्यानच्या कालावधीत नव्याने रास्तभाव दुकान मंजूर करण्याची प्रक्रिया पूर्ण करून आदर्श महिला परिवार बचत गट यांना दुकान मंजूर करण्यात आले.

श्री. ढगे यांनी जिल्हा पुरवठा अधिकारी व उप आयुक्त (पुरवठा) यांनी दिलेल्या निर्णयाविरुध्द मा.मंत्री (अनापु व ग्रासं) यांच्याकडे अपिल केले होते. त्यावर दि.८.९.२०१५ रोजीच्या आदेशान्वये जिल्हा पुरवठा अधिकारी व उप आयुक्त (पुरवठा) यांनी दिलेले आदेश रद्द करण्याचा निर्णय देण्यात आला असून श्री.ढगे यांचे दुकान पुन:श्च सुरू करण्यात आले आहे.
(५) प्रश्नच उद्भवत नाही.

---

## राज्यातील वडार समाजाच्या विविध मागण्याबाबत

**(३०) १३९२८१ (०९-०७-२०१९). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **विमुक्त जाती,भटक्या जमाती,इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर येथे दिनांक १७ डिसेंबर २०१८ रोजी वडार समाजाच्या अधिवेशनामध्ये हजारोंच्या संख्येने उपस्थित राहून मा.मुख्यमंत्री यांच्याकडे वडार समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश करावा, राज्यातील युवकांना उद्योगधंद्यासाठी वसंतराव नाईक आर्थिक विकास महामंडळामार्फत पुरेसा निधी उपलब्ध करून देणे व अन्य मागण्या करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वसंतराव नाईक आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून आराखडा तयार करून शंभर कोटी रुपयांचा निधी देण्याचे आश्वासन मा.मुख्यमंत्री यांनी दिले आहे,हे ही खरे आहे काय,
(३) तसेच वडार समाजासाठी नवीन महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे काय,
(४) असल्यास, सदर मागण्या मान्य करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. संजय कुटे (२३-०८-२०१९) :** (१) सदर मागण्यांबाबतचे निवेदन दिनांक १७/१२/२०१८ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांना सादर केल्याची नोंद आढळून येत नाही .

(२) दिनांक १७.१२.२०१८ रोजी सोलापूर येथे आयोजित वडार समाजाच्या मेळाव्यामध्ये वडार समाजाच्या विकासासाठी वसंतराव नाईक आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून उपआराखडा तयार करुन त्यासाठी १०० कोटी रुपयांची आर्थिक तरतूद केली जाईल, अशी घोषणा मा.मुख्यमंत्री महोदयांनी केली आहे.

(३), (४) व (५) वडार समाजातील लोकांच्या आर्थिक उन्नतीकरीता विशेष योजना सूचविण्यासाठी शासन निर्णय दि.२२/०२/२०१९ अन्वये समिती गठीत करण्यात आली असून शासन निर्णय दि.०२/०३/२०१९ अन्वये सदर समितीच्या अध्यक्ष पदावर श्री.विजय लक्ष्मण चौगुले, रा.ऐरोली, नवी मुंबई यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच, दिनांक ८.३.२०१९ च्या शासन निर्णयान्वये श्री. चौगुले यांना राज्यमंत्री पदाचा दर्जा देण्यात आला आहे. सदर समितीचा अहवाल शासनास अद्यापि अप्राप्त आहे.

---

**खोडाळा (जि.पालघर) येथील खोडाळा मंडळ कृषी अधिकारी कार्यालय सुरु करण्याबाबत**

**(३१) १३९३३६ (०५-०७-२०१९). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खोडाळा (जि.पालघर) येथील खोडाळा मंडळ कृषी अधिकारी कार्यालय बंद असल्याचे माहे डिसेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, खोडाळा येथील ५० हून अधिक गांवमधील शेतक-यांच्या शेतीविषयी तक्रारी, रोजगार, विविध अनुदान योजना अशी असंख्य कामे होत नसल्यामुळे शेतक-यांना त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन खोडाळा मंडळ कृषी अधिकारी कार्यालय सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अनिल बोंडे (०३-०९-२०१९) :** (१), (२) व (३) खोडाळा (जि.पालघर) येथील खोडाळा मंडळ कृषी अधिकारी कार्यालय माहे डिसेंबर, २०१८ पासून नियमितपणे कार्यालयीन वेळेत सुरु असून शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीविषयक अडीअडचणी तसेच विभागाच्या योजनेसंबंधी वेळोवेळी मार्गदर्शन करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील साखर उद्योग अडचणीत सापडल्याबाबत**

**(३२) १३९४६५ (१०-०७-२०१९). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड**

**उत्तर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने मार्च महिन्यातील खुल्या विक्रीसाठी २४ लाख ५० हजार टन साखरेचा कोटा निश्चित केल्याने राज्यातील साखर उद्योग अडचणीत सापडल्याचे दिनांक ७ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी बाजाराची मागणी २० ते २१ लाख टन सारखेची असल्याने निर्धारित कोटा असलेली साखर विकायची कशी या विवंचनेत साखर कारखाने आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र शासनाने निश्चित केलेल्या साखर कोट्यामुळे राज्यातील अडचणीत सापडलेल्या साखर कारखान्यांच्या अडचणी दुर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२६-०८-२०१९) :** (१) नाही. सर्वसाधारणपणे दर महिन्याला २०-२१ लाख मे.टन साखर विक्री कोटा देशपातळीवरील सर्व साखर कारखान्यांसाठी रिलीज केला जातो. त्यापैकी महाराष्ट्र राज्यातील साखर कारखान्यांसाठी सर्वसाधारणपणे ८ लाख मे.टन साखर विक्री कोटा दिला जातो. मार्च २०१९ महिन्यांमध्ये त्यापेक्षा जास्त म्हणजे २४.५० लाख मे.टन देश पातळीवरील सर्व साखर कारखान्यांसाठी साखर विक्री कोटा रिलीज करण्यात आला. महाराष्ट्रातील सर्व साखर कारखान्यांनी ८.७९ लाख मे.टन साखर विक्री केली ती नेहमीच्या मासिक विक्रीपेक्षा जास्त प्रमाणात आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्हयातील अल्पसंख्याक समाजातील तरुणांना व्यवसाय-उद्योगांसाठी निधी देण्याबाबत

**(३३) १३९६०९ (०६-०७-२०१९). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अल्पसंख्याक समाजातील तरुणांना विविध व्यवसाय-उद्योगांच्या माध्यमातून व्यवसाय, उद्योगाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात याकरिता मौलाना आझाद महामंडळाला गती मिळण्यासाठी शासनाने या महामंडळासाठी ४०० कोटीची तरतूद केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त महामंडळामार्फत या योजनांची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, आतापर्यत कोल्हापूर जिल्हयातील किती तरुणांना उद्योगांसाठी कर्ज उपलब्ध करुन देण्यात आले आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२८-०८-२०१९) :** (१) आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या अल्पसंख्याकांच्या सामाजिक व आर्थिक उन्नतीसाठी विविध कर्ज योजना राबविण्यासाठी शासनाने महामंडळाचे प्राधिकृत भाग भांडवल रू.५००.०० कोटी इतके निश्चित केले आहे. आतापर्यंत शासनाने महामंडळास रू.४५०.६९ कोटी एवढे भाग भांडवल टप्याटप्याने वितरीत केले आहे.
(२) व (३) महामंडळामार्फत अल्पसंख्याक आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील सुशिक्षित बेरोजगारांना व्यवसायासाठी कर्ज स्वरूपात सहाय्य देण्यात येत आहे.
आतापर्यंत कोल्हापूर जिल्ह्यात २६५५ लाभार्थ्यांना व्यवसायासाठी/ उद्योगासाठी रू.६,५५,६३,३७८/- कर्ज उपलब्ध करून देण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली जिल्हयासह राज्यात कुंभार समाजाचा व्यवसाय बंद होत असल्याबाबत**

**(३४) १३९६१६ (११-०७-२०१९). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्हयासह राज्यात चिनी वस्तूंनी बाजारपेठांवर कब्जा केल्यामुळे मातीपासून तयार होणाऱ्या वस्तूंना आता बाजारात दर आणि मागणीही नसल्यामुळे वंशपंरापरागत कुंभार समाजाचा व्यवसाय बंद होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कुंभार समाजाचा व्यवसाय बंद होत असल्याने त्यांच्या कुटूंबियांना उदरनिर्वाहासाठी अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पारंपारिक व्यवसाय व कला टिकावी यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२७-०८-२०१९) :** (१) असे निदर्शनास आलेले नाही.
(२) असे निदर्शनास आलेले नाही.
(३) महसूल व वन विभागाच्या दि.२१.०७.२०१४ च्या अधिसूचनेनुसार पिढीजात कुंभाराच्या कुटुंबाना विटा, कौले किंवा इतर वस्तु तयार करण्यास त्यांच्या व्यवसायाच्या प्रयोजनासाठी आवश्यक मातीच्या ५०० ब्रासपर्यंतच्या स्वामित्वधनातून सूट देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अलिबाग (जि.रायगड) येथील कुलाबा किल्ल्याच्या दुरुस्तीबाबत**

**(३५) १४००१४ (१०-०७-२०१९). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) येथील कुलाबा किल्ल्याची मोठया प्रमाणात दुरवस्था झाली असून किल्ल्याचे बुरुज ढासळले तसेच किल्ल्याच्या परिसराला झाडाझुडपांनी वेढले असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या किल्ल्याच्या दुरवस्थेबाबत पुरातत्व खात्याला तक्रार करुनही त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर किल्ल्याची तातडीने दुरुस्ती करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०८-२०१९) :** (१) हे खरे आहे.

तथापि कुलाबा किल्ला हे भारतीय पुरातत्व विभागाच्या अखत्यारीतील राष्ट्रीय संरक्षित स्मारक आहे.

(२) हे खरे नाही.

(३) कुलाबा किल्ल्याची तटभिंती व बुरूजांची दुरावस्था झाली आहे. या कामासाठी भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, मंडळ कार्यालय, मुंबई यांनी अंदाजपत्रक तयार केले असून ते महानिदेशक, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभाग, नवी दिल्ली यांच्याकडे मंजूरीकरिता सादर केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात रेशनिंगवर नियमित धान्य मिळत नसल्याबाबत**

**(३६) १४०१९० (१०-०७-२०१९). श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रेशनिंगमध्ये अनेकदा धान्य मिळत नसणे, धान्य केव्हा येते, केव्हा संपते तेच ग्राहकांना कळत नसणे तसेच असले तरी ते निकृष्ट दर्जाचे असणे तसेच सदर धान्यासाठी अधिक रक्कम घेत असल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्या असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गरीब नागरीकांची वाढत्या महागाईत अन्नधान्याची परवड होऊ नये याकरिता शासनामार्फत धान्य वितरण केले जात असणे, त्यासाठी धान्य दुकानांना शासनाने परवानेही दिले असणे परंतू या दुकानामध्ये संबंधित लाभार्थ्यांना बहुतांशी धान्यच देण्यात येत नाही किंवा खराब तसेच शासकीय दरापेक्षा वाढीव दराने मिळत असल्याने गोरगरीबांची आर्थिक कुंचबणा होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२८-०८-२०१९) :** (१) व (२) राज्यातील सर्व जिल्हयात रास्त भाव धान्य दुकानास, गोदामातून धान्य पोच झाल्याबाबत Sms व्दारे संपूर्ण गावात कळविले जाते. भारतीय खाद्य निगमच्या तंत्रप्रशिक्षित कर्मचाऱ्यांमार्फत अन्न धान्याचे निरिक्षण करून त्यांचा दर्जा तपासून धान्य वितरण केले जाते. राज्यातील पात्र शिधापत्रिका धारकांना e- POS मशिनद्वारे बायोमेट्रीक पध्दतीने बोटाचे ठसे घेऊन आधारद्वारे पडताळणी करून लाभार्थ्यांना धान्याचे वितरण केले जाते.

लाभधारकांकडून पैसे जास्त घेणे, दुकानातून धान्य देण्यास टाळाटाळ करणे इ. प्रकारच्या विविध तक्रारी शासनाकडे प्राप्त होतात. या तक्रारींची चौकशी करून दुकानदार दोषी आढळल्यास त्याविरुध्द कारवाई करण्यात येते.
(३) प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने माहे मे, २०१९ दरम्यान दोषी आढळून आलेल्या ३७६ रास्त भाव दुकानांपैकी २३ दुकाने निलंबित करण्यात आली असून २२ दुकाने रद्द करण्यात आली आहेत. त्याचप्रमाणे, रु.१४,६३,५७३/- दंड वसुली व रु.८,३५५/- इतक्या रक्कमेचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जामगांव (ता.अकोले, जि.अहमदनगर) येथील बेकायदा सावकारीच्या जाचामुळे एका युवकाने केलेली आत्महत्या**

**(३७) १४०४०५ (१३-०७-२०१९). श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जामगांव (ता.अकोले, जि.अहमदनगर) येथील युवकाने सावकाराच्या जाचाला कंटाळुन माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान आत्महत्या केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी बेकायदेशीर सावकारीबाबत व आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या सावकारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०८-०८-२०१९) :** (१) व (२) श्री.वाल्मिकी शिवाजी आरोटे, रा.जामगांव, ता.अकोले, जि.अहमदनगर यांनी दिनांक २३.०४.२०१९ रोजी खाजगी सावकाराच्या जाचास कंटाळून आत्महत्या केली असल्याचे सहाय्यक पोलीस निरिक्षक, राजुर पोलीस स्टेशन, तालुका कृषी अधिकारी व तहसिलदार, अकोले यांच्या संयुक्तीक अहवालावरुन प्रथमदर्शनी निदर्शनास येत आहे. त्यानुसार राजुर पोलीस स्टेशन, ता.अकोले यांनी संबंधित ७ व्यक्तींविरुध्द दिनांक १६.०५.२०१९ रोजी भारतीय दंड संविधान तसेच महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ मधील तरतुदींनुसार गुन्हा दाखल केला असून पुढील कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यामधील पूर्णगड, बाणकोट, यशवंतगड, भरतगड या चार ऐतिहासिक किल्ल्यांच्या दुरुस्तीबाबत**

**(३८) १४०४२१ (०८-०७-२०१९). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण), श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यामधील पूर्णगड, बाणकोट, यशवंतगड, भरतगड या चार ऐतिहासिक किल्ल्यांच्या दुरुस्तीसाठी सुमारे १५ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा निधी अद्याप प्राप्त न झाल्यामुळे सदर किल्ल्यांची दुरुस्ती प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास सदरचा निधी संबधीत विभागाला प्राप्त होऊन किल्ल्याची दुरुस्ती होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०८-२०१९) :** (१) रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यामधील पूर्णगड, बाणकोट, यशवंतगड, भरतगड या चार ऐतिहासिक किल्ल्यांच्या दुरुस्तीसाठी एकूण रू.१६,६७,०७,७९२/- इतक्या रक्कमेस मंजूरी देण्यात आली आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

उपरोक्त किल्ल्यांची कामे प्रगतीपथावर असून कामाच्या प्रगतीनुसार आतापर्यंत रू.६,८३,७२,७७८/- इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माण (जि.सातारा) तालुक्यातील पुरवठा विभागात लाच घेत असल्याच्या तक्रारींबाबत**

**(३९) १४०५४२ (१०-०७-२०१९). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माण (जि.सातारा) तालुक्यातील पुरवठा विभागात रेशनिंग संदर्भातील कोणत्याही कामासाठी सर्वसामान्य नागरिकांकडून येथील अधिकारी व कर्मचारी लाच घेत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी करुन येथील लाचखोर व दप्तर दिरंगाई करणारे अधिकारी- कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०९-०८-२०१९) :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सातारा जिल्हयातील दुष्काळी तालुक्यात कर्ज वसूलीस स्थगिती देण्याबाबत**

**(४०) १४०५४३ (१०-०७-२०१९). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त भागात यंदाच्या खरीप हंगामातील वसूलीला स्थगितीचा निर्णय दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जे दुष्काळग्रस्त शेतकरी हे कर्ज फेडू शकत नाहीत अशा शेतकऱ्यांची संमती घेवून पीक कर्जाचे व्याजासह मध्यम कर्जात पुनर्गठण करण्याच्या सूचना दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी योग्य अंमलबजावणी होत नसून, या निर्णयाची व सूचनेची दखल न घेणाऱ्या सहकारी संस्थाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०४-०९-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन परिपत्रक दिनांक १९/१२/२०१८ व दिनांक ०७/०३/२०१९ अनुषंगाने कार्यवाही करण्याकरीता सातारा जिल्हा मध्यवर्ती बँक लि., सातारा तसेच जिल्हा अग्रणी बँकेस पत्रान्वये कळविण्यात आले आहे. तसेच सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने देखील बँकेच्या शाखांना पुनर्गठन करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत.

(४) दुष्काळग्रस्त भागातील कर्जाच्या वसुलीबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झाली नसल्याचे तसेच शेतकऱ्यांची संमती घेऊनच त्यांच्या कर्जाचे पुनर्गठन करण्याची कार्यवाही सुरू असल्याचे जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सातारा यांनी कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडचिरोली विधानसभा क्षेत्रात जिल्हा परिषद अंतर्गत सिंचाई विभागाने केलेल्या कोल्हापुरी पेटर्ननुसार केलेल्या बंधाऱ्याच्या कामाबाबत**

**(४१) १४०७३३ (११-०७-२०१९). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली विधानसभा क्षेत्रात जिल्हा परिषद अंतर्गत सिंचाई विभागाने कोल्हापुरी पेटर्न बंधाऱ्याचे किती बांधकाम केले आहे,

(२) असल्यास, त्यातील किती बंधारे चालू आहेत व किती बंधारे नादुरुस्त आहेत,

(३) असल्यास, सदर बंधाऱ्यामधून किती जमिनीला सिंचनाची सुविधा मिळाली आहे व किती क्षेत्र नव्याने सिंचनाखाली येणार आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२९-०८-२०१९) :** (१) जिल्हा परिषद, लघुपाटबंधारे विभाग, गडचिरोली यांचेमार्फत गडचिरोली विधानसभा क्षेत्रात एकूण ३६४ बंधारे बांधण्यात आले आहेत.

(२) ३६४ बंधाऱ्यापैकी ३२२ बंधारे उपयोगात आहेत व ४२ बंधारे नादुरुस्त आहे.

(३) उपयोगात असलेल्या ३२२ बंधाऱ्यांमधून ६१९५.१५ हेक्टर जमिनीला सिंचानाची सुविधा मिळाली आहे व ४२ बंधाऱ्यांची दुरुस्ती केल्यानंतर ११८१.३२ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.

---

**महाड व पोलादपूर (जि.रायगड) तालुक्यात सुशिक्षित बेरोजगारांच्या संख्येत झालेली वाढ**

**(४२) १४०८२४ (१३-०७-२०१९). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड व पोलादपूर (जि.रायगड) तालुक्यात अनेक वर्षात एकही नविन उद्योग न आल्यामुळे सुशिक्षित बेरोजगारांची संख्या वाढत असल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, उद्योगाचे साधन नसल्यामुळे अनेक सुशिक्षित बेरोजगारांना रोजगारासाठी इतर ठिकाणी स्थलांतरित व्हावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तालुक्यातील सुशिक्षित बेरोजगार तरूणांना रोजगार उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०२-०८-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) रायगड जिल्हयातील महाड व पोलादपुर तालुक्यात एकूण ९२७ सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम मार्च -२०१९ अखेर नोंदणीकृत असून, त्याव्दारे ४६४८ इतकी रोजगार निर्मिती झाली आहे. तसेच ३० मोठे उद्योग कार्यरत असून, त्याव्दारे ३५५३ इतकी रोजगार निर्मिती झाली आहे.

(३) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत उद्योगासाठी भूखंड वाटप करतेवळी करण्यात येणाऱ्या करारनाम्यामध्ये स्थानिक तसेच प्रकल्पग्रस्तांना नोकरीमध्ये प्राधान्य देण्याबाबत खालीलप्रमाणे मुद्ये समाविष्ट करण्यात येतात:-

i) That in employing skilled and unskilled labour, the Licensee shall give first preference tot he persons who are ablebodied and fulfilling general qualifications as prescribed by the Licensee and whose lands are acquired for the purpose of the said Industrial Area.

ii) the Licensee shall also endeavor to employ the local persons considering their knowledge of handling and operating the equipment/machineries used by the Licensee and fulfilling the general qualifications as prescribed by the Licensee.

तसेच सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार व स्वयंरोजगार उपलब्ध व्हावा म्हणून केंद्र शासन पुरस्कृत पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना तसेच राज्य शासन पुरस्कृत सुधारित बीज भांडवली व उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम योजना राबविण्यात येतात. पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमातंर्गत महाड तालुक्यात मागिल तीन वर्षात एकूण ११ प्रकल्पांव्दारे ७५ बेरोजगारांना रोजगार निर्मिती करुन देण्यात आली असून, सुधारित बीज भांडवल योजनेतंर्गत महाड व पोलादपूर तालुक्यात एकूण १२ प्रकल्पांव्दारे रोजगार निर्मिती करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील आधारकार्ड शिधा पत्रिकांसोबत जुळत नसलेल्या व्यक्तींना धान्य पुरवठा करण्याबाबत**

**(४३) १४१०५६ (०९-०७-२०१९). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यात बनावट शिधा पत्रिका शोधण्यासाठी अन्न पुरवठा विभागाने तालुक्यातील ४० हजार ८५९ कार्डातील २ लाख ८ हजार ८७८ लोकांच्या आधार कार्ड तपासणीचे काम सुरू केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणात वयोवृध्द नागरिकांचे व लहान मुलांच्या बोटाचे ठसे आधार संलग्न होत नसल्याने ऐन दुष्काळात त्यांना धान्यापासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्या नागरिकांचे आधारकार्ड शिधा पत्रिकांसोबत जुळत नसतील अशा व्यक्तींना शासन धान्य पुरवठा करणार आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दुष्काळी भागातील जनता धान्यापासून वंचित राहू नये यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२९-०८-२०१९) : (**१) होय, हे खरे आहे. मंगळवेढा तालुक्यामध्ये AePDS ऑनलाईन प्रणालीमध्ये अंत्योदय योजनेचे एकून ४१२५ शिधापत्रिका असुन त्यापैकी एकूण ३७९३ शिधापत्रिकांची आधार सिडींगचे काम पुर्ण झाले आहे. प्राधान्य कुटुंब लाभार्थी योजनेचे एकूण १०२२१० लाभार्थी असुन त्यापैकी एकूण ७०४९३ लाभार्थ्यांचे आधार सिडींगचे काम पुर्ण झालेले आहे. तसेच उर्वरीत आधार सिडिंगचे कामकाज पुर्ण करणेचे काम प्रगतीपथावर आहे.

(२) ई-पॉस उपकरणाद्वारे कुटुंबातील कोणत्याही एका सदस्याचे Aadhar Authentication झाले असले तरी धान्य वितरण करण्यात येते. ज्या लाभार्थ्यांचे आधार क्रमांक ई-पॉस मशिनवर संलग्न होत नाहीत अशा शिधापत्रिकेकरीता नॉमिनी नेमून नॉमिनीचे Aadhar Authentication करुन संबंधित लाभार्थी यांना धान्य वितरीत करण्यात येते.

(३) व (४) ज्या पात्र लाभार्थी यांचे ई पॉस मशिन वर ठसे संलग्न होत नाहीत अशा लाभार्थी यांना नॉमिनी नियुक्ती कारून धान्य वितरीत करण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोरेगाव पुर्वेकडील फिल्मसिटीत बिग बॉसच्या शुटिंगसाठी वृक्ष तोडण्यात आल्याबाबत**

**(४४) १४१३८३ (१०-०७-२०१९). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोरेगाव पुर्वेकडील फिल्मसिटीत बिग बॉस च्या शुटिंगच्या सेटसाठी इंडोमॉल साईन इंडिया कंपनीकडून दिनांक २९ एप्रिल, २०१९ रोजी वृक्ष तोडण्यात आल्याची तक्रार सामाजिक कार्यकर्ते श्री.राजकिरण साळवे यांनी फिल्मसिटीच्या स्टूडिओ मॅनेजर श्रीमती सुनीता शेलार यांना दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वृक्षतोड झाल्याची तक्रार आरे पोलीस ठाण्यात केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधीत दोषीवर कोणती कारवाई केली आहे तसेच याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०८-२०१९) :** (१) होय.
(२) होय.
(३) प्रस्तुत प्रकरणी आरे पोलीस ठाणे, मुंबई यांनी अदखलपात्र गुन्हा क्र.७२२/१९ व वि.स्था.गु.२८/१९ कलम ८(१), सह २१ महा. (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन संरक्षण अधिनियम १९७५प्रमाणे गुन्हे नोंदविले असून, पोलीसांमार्फत मा.६८ वे न्यायालय, बोरिविली मुंबई यांची सदर गुन्हयाचे तपास करण्याची परवानगी घेवून सदर गुन्हयाचा तपास चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर शहरातील ब्रम्हपुरी टेकडीवरील अतिक्रमण हटविण्याबाबत**

**(४५) १४१४२९ (१०-०७-२०१९). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर शहरातील ब्रम्हपुरी टेकडी परिसरातील जागा पुरातत्व विभागाच्या अखत्यारीत असून हि जागा कोल्हापूर च्या इतिहासाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची असल्याने आजही या जागेवर केंद्रीय पुरातत्व विभागाची नोंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जागेवर अतिक्रमण, बांधकाम किंवा खोदाई करण्यास मनाई असून त्या जागेवर विना परवाना प्रवेश करणे गुन्हा असल्याबाबतच्या आशयाचा फलक त्या ठिकाणी लावण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्या जागेवर पूर्वी कोणतीही बांधकामे नव्हती परंतु आता सदर जागेसंबंधि स्टॅम्प पेपरवर व्यवहार करून अनधिकृत बांधकामे केली आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर जागेवरील अतिक्रमणे हटवून जागा पुरातत्व खात्याकडे देणे तसेच अनधिकृतरित्या जागेवर अतिक्रमण करणाऱ्यांवर कारवाई करणेबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०८-२०१९) :** (१) हे खरे आहे.

कोल्हापूर शहरातील ब्रम्हपुरी टेकडी परिसरातील जागा ही भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, मुंबई मंडल कार्यालयाच्या अखत्यारीतील राष्ट्रीय संरक्षित पुरास्थळ आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) हे अंशत: खरे आहे.

ब्रम्हपुरी टेकडी या पुरास्थळावर अतिक्रमणकर्त्यांनी अतिक्रमण केले होते. नुकतेच जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी या टेकडीवर उत्खनन झालेल्या पुरास्थळाचे स्थळ आराखडयात सीमांकन निर्धारीत केले असून त्यावर जिल्हाधिकारी, कोल्हापूर व भारतीय पुरातत्व सर्वेक्षण यांनी स्वाक्षरी केली आहे. सदर पुरास्थळ जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्याद्वारे भारतीय पुरातत्व सर्वेक्षण यांना भौतिकदृष्ट्या हस्तांतरीत करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डहाणू (जि.पालघर) येथील ऐतिहासिक डहाणू किल्ल्यातील दुय्यम कारागृहाच्या दुरुस्तीबाबत**

**(४६) १४१८०७ (०९-०७-२०१९). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यातील डहाणू रेल्वे स्थानकापासून पाच किलामीटर अंतरावर समुद्रीकिनारी असलेल्या ऐतिहासिक डहाणू किल्ल्याची दयनीय अवस्था झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू किल्ल्यात १९८८ मध्ये दुय्यम कारागृह बांधण्यात आले असून या कारागृहाच्या देखभाल-दुरुस्तीकडे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, डहाणू किल्ल्याच्या झालेल्या दुरवस्थेबाबत शासनाच्या पुरातत्व विभागाने पाहणी केली आहे काय, त्यानुसार किल्ल्याच्या दुरुस्तीबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०८-२०१९) :** (१) डहाणू किल्ला हा राष्ट्रीय संरक्षित स्मारक नाही व राज्य संरक्षित स्मारकही नाही. तथापि डहाणू किल्ल्याची दुरावस्था झाली असल्याचे निदर्शनास आले नाही.

(२) असे निदर्शनास आले नाही.

(३) सदरचा किल्ला हा या विभागाच्या अखत्यारीतील राज्य संरक्षित स्मारक नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यातील १४ साखर कारखान्यांचे थकित एफआरपीचे रक्कम अदा करण्याबाबत**

**(४७) १४१८५९ (११-०७-२०१९). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील साखर कारखान्याच्या संपलेल्या गाळप हंगामात १७ पैकी ३ कारखान्यांनी उसाच्या एफआरपीची १०० टक्के रक्कम दिनांक १५ मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान दिली असून सदर एफआरपीचे रुपये २७५० कोटी जमा करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी उर्वरित १४ साखर कारखान्यांची रु.३४९ कोटी इतक्या रकमेची एफआरपीची थकीत रक्कम असल्याचे पुणे प्रादेशिक साखर सहसंचालक यांच्यामार्फत निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन उर्वरित १४ साखर कारखान्यांची रु.३४९ कोटी एफआरपीची थकीत रक्कम अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०३-०९-२०१९) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

हंगाम २०१८-१९ मध्ये पुणे जिल्ह्यातील १७ साखर कारखान्यांनी FRP अदायगीबाबत ऊस पुरवठादारांशी केलेल्या करारानुसार १७ पैकी ८ कारखान्यांनी ऊसाच्या एफआरपीची १००% रक्कम दि.१५ मे, २०१९ अखेर ऊस पुरवठादारांना अदा केली असून रु.२७५०.६८ कोटी रकमेचे पेमेंट केलेले आहे. उर्वरित ९ कारखान्यांकडे FRP अदायगीबाबत ऊस पुरवठादारांशी केलेल्या करारानुसार रु.१९८.४१ कोटी रक्कम थकीत होती.

(३) थकीत FRP अदायगी त्वरीत करावी, यासाठी साखर आयुक्तालयामार्फत वेळोवेळी पाठपुरावा करण्यात आला आहे. त्यामुळे दि.१५.७.२०१९ अखेर १७ पैकी १४ कारखान्यांनी करारानुसार FRP ची १०० % रक्कम शेतकऱ्यांना अदा केली आहे. उर्वरित ३ कारखान्यांकडे एफआरपीची करारानुसार एकूण रु.१०.४५ कोटी रक्कम थकबाकी आहे. सदर थकीत एफआरपी सत्वर देणेबाबत संबंधितांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. सदर ३ कारखान्यांपैकी भीमा पाटस सहकारी साखर कारखाना, पाटस या कारखान्यावर RRC कारवाई करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयातील रास्त भाव दुकानातून शिधापत्रिका धारकांना धान्य वाटप करण्याबाबत**

**(४८) १४२०७५ (१०-०७-२०१९). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील रास्त स्वस्त भाव दुकानातून सन २०१८ पासून शिधापत्रिका धारकांना ऑनलाईन पध्दतीने वाटप करण्याचे शासनाने निर्देश दिले असतांनाही दिनांक १९ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास धान्य वाटप बंद करण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बंद करण्यात आलेले धान्य वाटप सुरु करुन शिधापत्रिकाधारकांना धान्य मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०१-०८-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कौठळ (जि.धुळे) गावात तसेच जिल्ह्यात भीषण पाणीटंचाई निर्माण झाली असल्याबाबत**

**(४९) १४२८६५ (११-०७-२०१९). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कौठळ (जि.धुळे) तसेच धुळे जिल्ह्यात पाणीटंचाई निर्माण झाली असल्याचे माहे एप्रिल, २०१९ रोजी मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कौठळ हे गाव मा.मुख्यमंत्री महोदयांनी दत्तक घेतले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कौठळ गावासह तालुक्यातील पाणी टंचाई दूर करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (३०-०७-२०१९) :** (१) कौठळ गावात पाणी टंचाई नाही. तथापि, धुळे जिल्हयात काही ठिकाणी पाणी टंचाई आहे.

(२) हे खरे नाही.

सदर गाव ग्राम सामाजिक परिवर्तन अभियानात समाविष्ठ आहे.

(३) पांझरा नदीत अक्कलपाडा धरणातील पाण्याचे दोन आवर्तने सोडण्यात आलेली असल्याने कौठळ गावात पाणी टंचाई नाही.

सद्य:स्थितीत धुळे तालुक्यात एकूण २८ विहिर अधिग्रहीत केल्या असून एकूण २३ गावांना टँकरने पाणी पुरवठा सुरु आहे. ३ तात्पुरत्या नळ पाणी पुरवठा योजना मंजूर करुन पाणी पुरवठा सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वैद्यकीय पदव्युत्तर शिक्षण अभ्यासक्रमात मराठा आरक्षण लागू करणेबाबत**

**(५०) १४३३१६ (१८-०७-२०१९). श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वैद्यकीय पदव्युत्तर शिक्षण अभ्यासक्रमात मराठा आरक्षण लागू करणे बाबत मराठा समाजाने आंदोलन व मोर्चे काढले असल्याने या अभ्यासक्रमात आरक्षण लागू करणे बाबत राज्य शासनाकडून आश्वासन दिले तथापि या आश्वासनाची पूर्तता होत नसल्यामुळे मराठा समाजात गैरसमजूतिचे वातावरण निर्माण झाल्याचे निदर्शनास येत आहे,हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, राज्य शासनाकडून या बाबत कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२८-०८-२०१९) :** (१) नाही, हे खरे नाही.
(२) वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेत सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास वर्गाकरिता (एसईबीसी) आरक्षण लागू केले असून त्यानुसार प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.